(७)

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक :संकिर्ण-२०२३/प्र.क्र.२३८/कोषा. प्रशा.२

वित्त विभाग, तिसरा मजला (विस्तार)
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा
मार्ग, मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक :-०६/०९/२०२३.

संचालनालय लेखा व कोषागारे
महाराष्ट्र राज्य, मुंबई-20
06 SEP 2023
प्राप्त झाले सही........

## आदेश

सामान्य प्रशासन विभागातील भा. प्र. से. कक्षाच्या आस्थापनेवरील सहायक संचालक (लेखा) या रिक्त पदावर शासन आदेश दि.२८/०६/२०२३ अन्वये श्री. दत्ताजी लोंढे यांची पदस्थापना नियमित बदलीने करण्यात आली होती. तथापि, वित्त विभाग, शासन आदेश दि.३१/०८/२०२३ अन्वये श्री. लोंढे यांच्या बदली आदेशात अंशत: बदल करुन त्यांची सुधारीत पदस्थापना सहायक संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा महानगरपालिका लेखा परीक्षण, उपविभाग-१, कोकण-२ विभाग, नवी मुंबई येथे करण्यात आली आहे. यास्तव, सहाय्यक संचालक (लेखा), भा. प्र. से. कक्ष, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई हे पद सद्य:स्थितीत रिक्त आहे.

तरी सहाय्यक संचालक (लेखा), भा. प्र. से. कक्ष, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई या पदावर सहायक संचालक संवर्गातील नियमित अधिकारी उपलब्ध होईपर्यंत सदर पदाचा अतिरिक्त कार्यभार श्रीमती दिपा पाटील, सहायक संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांचेकडे सोपविण्यात येत आहे.

२. श्रीमती दिपा पाटील, सहायक संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई यांनी त्यांच्या नियमित पदाचा कार्यभार सांभाळून सहाय्यक संचालक (लेखा), भा. प्र. से. कक्ष, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई या पदाचा अतिरिक्त कार्यभार सांभाळावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावांने,

**(ता. र. पवार)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

६/९/२३

प्रति,

संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई.
संचालक, संचालनालय, स्थानिक निधी लेखा परीक्षा, कोकण भवन, नवी मुंबई*
संबंधित अधिकाऱ्यांचे सध्याचे कार्यालय*
अप्पर मुख्य सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
संबंधित अधिकारी*
निवडनस्ती कोषा प्रशा-२, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
(*संचालक, लेखा व कोषागारे, संचालनालय, मुंबई यांचे मार्फत)

1770/2023/2582
8/9

D:\THORAT kosh२ Sept२०२१\Thorat Kosha २\अतिरिक्त कार्यभार\प्र.क्र. -२०२३ भा.प्र.से. कक्ष.docx